पवित्र श्रावण मासारंभानिमित्त मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २१० । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शनिवार २९/०८/२०२६ । पाने - ६

सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# भटक्या कुत्र्यांची ‘तस्करी’ रोखली

## मेनका गांधींच्या हस्तक्षेपाने कुत्र्यांना मिळाले ‘अभय’



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शहरालगतच्या एका ग्रामपंचायत हद्दीतून सुमारे १० ते १५ भटक्या कुत्र्यांना रिक्षातून शहरातील अन्य परिसरात सोडण्यासाठी नेले जात असताना प्राणी मित्रांनी हा प्रकार रोखला. संबंधित व्यक्तीला पकडून शहर पोलिस ठाण्यात आणण्यात आले. मात्र, पोलिसांकडून अपेक्षित सहकार्य मिळाले नसल्याचा आरोप प्राणी मित्रांनी केला असून, या वेळी पोलिस ठाण्यात काही काळ बाचाबाची झाल्याची माहिती आहे.

भटके कुत्रे एका परिसरातून पकडून दुसऱ्या ठिकाणी सोडणे हा प्रकार मुक्या प्राण्यांवर अन्याय करणारा असल्याची भूमिका प्राणी मित्रांनी घेतली. संबंधित व्यक्तीविरोधात कारवाईची मागणी करूनही प्रशासनाने सुरुवातीला दखल घेतली नसल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, प्राणी मित्रांनी या घटनेची माहिती प्राणिसंवर्धन आणि संरक्षणाच्या कामासाठी देशभर परिचित असलेल्या माजी केंद्रीय मंत्री मेनका गांधी यांना दिली. गांधी यांनी तत्काळ या प्रकरणाची दखल घेत उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांशी संपर्क साधून घटनेत लक्ष घालण्याची मागणी केली.

यानंतर प्रशासनाने हालचाली करत संबंधित कुत्र्यांना सुरक्षित ठिकाणी सोडल्याचे समजते. दरम्यान, पोलिस ठाण्यात या प्रकरणावरून काही काळ जोरदार शाब्दिक वाद झाल्याची चर्चा आहे.

शहरातील एका स्थानिक प्रकरणाची थेट मेनका गांधी यांनी दखल घेतल्याने संगमनेर शहरात या घटनेची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. मुक्या प्राण्यांच्या संरक्षणासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने आणि नियमांच्या चौकटीत कारवाई करावी, अशी मागणी प्राणी मित्रांकडून होत आहे.

# महापुरामुळे संगमनेरचे पर्यटक नेपाळमध्ये अडकले !

## सर्वजण सुखरूप; मात्र अडचणी वाढल्या, सुटकेसाठी प्रयत्न सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -: नेपाळमध्ये ढगफुटी आणि महापुराने हाहाकार उडविल्याने महाराष्ट्रातील शंभरहून अधिक पर्यटक अडकून पडले असून, त्यामध्ये संगमनेरमधील ४५ पर्यटकांचा समावेश आहे. सुदैवाने हे सर्व पर्यटक सुखरूप असून सध्या चितवन येथे मुक्कामी आहेत. मात्र काठमांडूकडे जाणारे रस्ते बंद, आर्थिक व्यवहार ठप्प आणि वाढलेले हॉटेलचे दर यामुळे या पर्यटकांसमोरील अडचणी दिवसेंदिवस गंभीर होत आहेत.

संगमनेर येथील निर्मला गुंजाळ यांच्या माध्यमातून ‘एन्जॉय टूर’च्या ४५ जणांचा समूह २४ ऑगस्ट रोजी नेपाळ, अयोध्या, वाराणसी आणि प्रयागराज येथे पर्यटन व देवदर्शनासाठी रवाना झाला होता. नेपाळमधील परिस्थिती बिघडल्यानंतर या पर्यटकांचा प्रवास मात्र संकटात सापडला आहे.

याबाबत माहिती देताना निर्मला गुंजाळ यांनी सांगितले की, नेपाळमध्ये झालेल्या ढगफुटी आणि पुरामुळे मोठा प्रलय निर्माण झाला आहे. आम्ही बुधवारी आणि गुरुवारी काठमांडूत होतो. सध्या चितवन येथे मुक्कामी थांबलो आहोत. काठमांडूकडे जाणारे सर्व रस्ते बंद असल्याने पुढे कसे जायचे, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. पुढील ७२ तास अत्यंत धोकादायक असल्याची माहिती मिळत आहे.



आर्थिक अडचणीही वाढल्या आहेत. णझख आणि इतर ऑनलाइन व्यवहार बंद झाले असून, जवळचे पैसेही संपत आले आहेत. हॉटेलचे दर मोठ्या प्रमाणात वाढले असून काही ठिकाणी ते चौपट झाले आहेत. त्यामुळे पर्यटकांसमोर आर्थिक संकटही उभे राहिले आहे, असे गुंजाळ यांनी सांगितले.

दरम्यान, भारतीय सरकारच्या हेल्पलाइनच्या माध्यमातून पर्यटक संपर्कात आहेत. मात्र अद्याप नेपाळ सरकारकडून कोणताही ठोस संदेश किंवा मदतीची माहिती मिळालेली नसल्याचे त्यांनी सांगितले. आम्ही नेपाळचे पाहुणे आहोत. आमच्या सुरक्षिततेसाठी नेपाळ सरकारने निश्चितपणे मदतीचा हात पुढे करावा, अशी भावनिक विनंतीही त्यांनी केली.

राज्य आपत्कालीन नियंत्रण कक्षाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील अनेक पर्यटक सध्या उत्तर भारत, नेपाळ आणि तिबेट परिसरात आहेत. कैलास मानसरोवर यात्रेसह गेलेल्या भारतीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकार ‘अलर्ट मोड’वर असून, अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षितपणे भारतात आणण्यासाठी केंद्र सरकारशी चर्चा सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. संगमनेरमधील ४५ पर्यटक सुखरूप असले तरी त्यांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे प्रयत्न सुरू आहेत.

# ओबीसी प्रमाणपत्रावरून काँग्रेस-राष्ट्रवादीत वादाची ठिणगी



मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे ओबीसी प्रमाणपत्र असल्याचा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केल्याने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांच्यात पुन्हा एकदा राजकीय वादाची ठिणगी पडली आहे. वडेट्टीवार यांच्या या वक्तव्यावर सुप्रिया सुळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत आरोप फेटाळून लावला आहे.

माझ्याकडे ओबीसी प्रमाणपत्र असल्याचा आरोप धादांत खोटा आहे. माझ्याकडे असे प्रमाणपत्र असल्याची माहिती नेमकी कोणी आणि कोणत्या आधारावर दिली, हे विजय वडेट्टीवार यांनी जाहीर करावे, अशी मागणी सुळे यांनी केली आहे. तसेच, माझ्याकडे ओबीसी प्रमाणपत्र असल्याचा दावा खरा असेल तर त्याचा पुरावा जाहीरपणे सादर करून तो सिद्ध करावा; अन्यथा कोणत्याही पुराव्याशिवाय केलेल्या आरोपाबद्दल जाहीर माफी मागावी, असा थेट इशाराही सुप्रिया सुळे यांनी दिला आहे.

सोशल मीडियावरील पोस्टमधून भूमिका स्पष्ट करताना सुळे यांनी काँग्रेसवरही नाराजी व्यक्त केली. मी कधीही काँग्रेसला टार्गेट केलेले नाही. उलट अनेक वेळा काँग्रेसची पाठराखणच केली आहे. मात्र, काँग्रेसकडून रोज माझ्यावर आरोप का केले जातात, हे समजत नाही, असे त्यांनी म्हटले.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनीही वडेट्टीवार यांच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली. काँग्रेस नेत्यांच्या अशा वर्तनामुळेच २०१४ मध्ये सरकार गमवावे लागल्याचा पलटवार त्यांनी केला. तर शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी, संबंधित प्रमाणपत्र नियमांमध्ये बसत असेल तर त्यात गैर काय, असा सवाल उपस्थित केला.

वडेट्टीवार यांच्या आरोपामुळे सुरू झालेल्या या नव्या वादाने महाविकास आघाडीतील घटक पक्षांमधील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले असून, या आरोपाला काँग्रेसकडून आता कोणता पुरावा दिला जातो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# सरकारशी चर्चा नाही - जरांगे आंदोलनावर ठाम !

जालना (वृत्तसंस्था)

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिलेला अल्टिमेटम आज संपणार आहे. अर्धा दिवस उलटला तरी सरकारकडून कोणीही मनोज जरांगे यांच्याशी चर्चा करायला आले नाही. त्यामुळे आता जालन्याच्या अंतरवली सराटीत हालचाली वाढल्या आहेत. जरांगे उद्यापासून निर्णायक आंदोलन करणार आहेत. राज्यातील सर्व मराठ्यांना त्यांनी अंतरवलीत येण्याची हाक दिली आहे. त्या पार्श्वभूमीवर अंतरवलीत बैठका सुरू आहेत.



आंदोलनाची रणनीती ठरवली जात आहे.मनोज जरांगे पाटील उद्यापासून अंतरवाली सराटीमध्ये शेवटचं निर्णायक आंदोलन सुरू करणार आहेत. या सगळ्या संदर्भात आज दिवसभरात काय काय घडामोडी घडतात हे पाहणे अतिशय महत्त्वाचं ठरणार आहे. सरकारच्या शिष्टमंडळाने जरांगे यांना उपोषण न करण्याची विनंती केली होती. मात्र ५८ लाख नोंदींचे कुणबी प्रमाणपत्र यासह इतर प्रमुख मागण्यांसाठी जरांगे उद्याच्या निर्णायक आंदोलनावर ठाम आहेत. सरकारचं शिष्टमंडळ भेटीसाठी आल्यानंतर जरांगे पाटलांनी त्यांच्यासमोर या मागण्या ठेवल्या होत्या. त्या अनुषंगाने आज सरकारकडून मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत काही संपर्क होतो का? याकडे सर्वांचं लक्ष लागलंयमनोज जरांगे पाटील अंतरवलीतच आहेत. कार्यकर्ते आणि समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तिंशी चर्चा करत आहेत. त्यांना आपली भूमिका समजावून सांगत आहेत. तसेच आंदोलनाच्या तयारीचा आढावाही घेत असल्याचं सूत्रांनी सांगितलं. दरम्यान, जरांगे यांनी आज परत एकदा आपली भूमिका स्पष्ट करत उद्या आंदोलन होणार असल्याचं संकेतही दिले आहेत. संध्याकाळपर्यंत काही होतंय का ते मी पाहणार आहे. ज्यांना यायचं ते चर्चा करायला येतील. मी संकटावर मात करण्यासाठी पक्का आहे. मी एकही मागणी मागे ठेवणार नाही, असं जरांगे म्हणाले. समाजाने घरात बसू नये. ज्यांनी कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज दिले आहेत. त्यांनी अंतरवलीत येऊन परत अर्ज द्यावे.

समाजाने मरगळ झटकून टाकावी. एकत्र यावे. ज्यांची नोंद सापडली. पण प्रमाणपत्र दिले नाही अशा लोकांनी देखील अर्ज द्यावेत. मराठ्यांनी नोंद घेऊन घरी झोपू नये, अंतरवालीत यावे, असं आवाहन करतानाच मराठ्यांचे वाटोळे करू नका. मराठे तुम्हाला थोबाडून काढतील, असा इशाराच त्यांनी राज्यकर्त्यांना दिला आहे.

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

सोन्यांच्या दागिन्यांची मजुरी फक्त 7%
मुदत फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
PBM Jeweller's
श्रावण मास आणि रक्षाबंधन निमित्त
चांदी खरेदीवर 30% DISCOUNT
ऑफर फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर चावडी जवळ, संगमनेर
7599996999 / 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

## मराठी शिकण्यासाठी एक वर्ष मुदतवाढ : मुख्यमंत्री

मुंबई - अमराठी रिक्षा, टॅक्सीचालकांना दैनंदिन संवादापुरती जुजबी मराठी शिकण्यासाठी राज्य सरकारने आता १ वर्षाची मुदतवाढ दिली आहे. या कालावधीत भाषेच्या कारणावरून चालकांवर कोणतीही दंडात्मक अथवा कायदेशीर कारवाई केली जाणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. महायुती समर्थक हाजी अराफत यांच्या नेतृत्वाखालील चालक संघटनांच्या शिष्टमंडळाने भेट घेतल्यानंतर हा दिलासा देण्यात आला मराठी भाषा प्रशिक्षण घेणाऱ्या रिक्षाचालकांना प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम शिंदेसेनेचे आमदार प्रकाश सुर्वेनी आयोजित केला होता. त्यात भोजपुरी गाण्यावर नृत्य सादर झाल्याबद्दल 'कार्यक्रमाचा आयोजक कोण? तर शहा सेनेचे रंगेल सुर्वे !' असा टोमणा उद्धवसेना पदाधिकारी अखिल चित्रेनी

लगावला. त्यावर सुर्वे म्हणाले की, कार्यक्रमात अनेक मराठी गाणी सादर झाली. उत्तर भारतीयांसाठी ते नृत्य सादर झाले होते. केंद्रातून हस्तक्षेप झाल्याने मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. मुंबईत मराठी सक्तीचे उत्तर प्रदेश, बिहारमध्ये पडसाद उमटले. २०२७ च्या यूपी विधानसभा निवडणुकीवर डोळा ठेवून समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी भाजपवर टीका केली. भाजपचे केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले. हे सर्व लक्षात घेऊन १ वर्ष मुदतवाढीचा निर्णय झाला. दुसरीकडे, शिंदेसेनेने उद्धवसेना, मनसेचा मराठी मुद्दा काही प्रमाणात घेण्याचा प्रयत्न केला. मात्र मराठी भाषा शिकायला एक वर्षाची मुदतवाढ देणे म्हणजे केंद्र सरकार आणि उत्तर प्रदेश निवडणूक डोळ्यासमोर ठेवून घेतलेला हा निर्णय आहे. असे स्पष्ट दिसत आहे.

## सोने-चांदीचे दरात घसरण

मुंबई (वृत्तसंस्था)

रक्षाबंधन सणाच्या दिवशीच सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. सणासुदीच्या काळात दागिने खरेदी करण्याचा विचार करणाऱ्यांसाठी ही महत्त्वाची बातमी आहे. आज २८ ऑगस्ट रोजी २४ कॅरेट शुद्ध सोन्याचा सरासरी दर १६,२९७ रुपये प्रति ग्रॅम, म्हणजेच १,६२,९७० रुपये प्रति १० ग्रॅम इतका आहे. तर दागिन्यांसाठी मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या २२ कॅरेट सोन्याचा भाव १४,९३९ रुपये प्रति ग्रॅम, म्हणजेच १,४९,३९० रुपये प्रति १० ग्रॅम आहे. रक्षाबंधनाच्या निमित्ताने अनेक जण बहिणीला सोन्याची अंगठी, पेंडेंट किंवा चांदीचे दागिने भेट देतात. त्यामुळे सणाच्या दिवशी सोन्या-चांदीच्या दरात झालेली घसरण ग्राहकांसाठी काही प्रमाणात दिलासादायक ठरू शकते. देशातील प्रमुख शहरांमध्ये आज १० ग्रॅम सोन्याचे दर जवळपास समान आहेत. दिल्ली, मुंबई, बंगळुरू आणि चेन्नईमध्ये २४ कॅरेट सोन्याचा दर १,६३,१३० रुपये, तर २२ कॅरेट सोन्याचा दर १,४९,५४० रुपये आहे. अहमदाबादमध्ये २४ कॅरेट सोन्याचा दर १,६३,०३० रुपये, तर २२ कॅरेट सोन्याचा दर १,४९,४४५ रुपये प्रति १० ग्रॅम आहे.

## मतदार यादीतील विसंगतींच्या सुनावणीचे अचूक नियोजन करा- उपजिल्हा निवडणूक अधिकारी



यवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले -अहिल्यानगर जिल्ह्यात विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मार्फत घरोघरी भेटी देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. आगामी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. या पार्श्वभूमीवर जुळणी न झालेले आणि तपशीलात विसंगती असलेल्या मतदारांच्या सुनावणीचे योग्य व सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांनी दिले. अकोले तहसील कार्यालयात आयोजित सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या या मोहिमेत जिल्ह्यातील ३८ लाख १० हजार मतदारांपैकी

८८.७८ टक्के मतदारांचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरित ११.२२ टक्के मतदार मयत, दुबार अथवा कायमस्वरूपी स्थलांतरित आढळले आहेत. अकोले मतदारसंघात असंकलित मतदारांचे प्रमाण केवळ ६.११ टक्के असून, हे संपूर्ण जिल्ह्यात सर्वात कमी आहे. जुळणी न झालेल्या व विसंगती असलेल्या मतदारांची सुनावणी २२ सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांमार्फत घेतली जाणार आहे. नागरिकांच्या सोयीसाठी ही सुनावणी गाव किंवा मंडळ स्तरावर घेण्याचे नियोजन करण्याच्या सूचना गाढे यांनी दिल्या. शहरी भागात सुनावणीची नोटीस व्हॉट्सअॅप किंवा ईमेलद्वारे बजावण्यास परवानगी देण्यात आली आहे. कागदपत्रांच्या अचूक पडताळणीसाठी जिल्हास्तरावर उपजिल्हाधिकारी मनीषा राशीनकर यांच्या अध्यक्षतेखाली कक्ष स्थापन करण्यात आला असून, तालुकास्तरावरही तातडीने समन्वय कक्ष सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

असंकलित मतदारांचे मूळ रेकॉर्ड बीएलओंनी सुरक्षित जतन करावे आणि प्रारूप यादी प्रसिद्धीनंतर कार्यालयांमध्ये नमुना ६, ७ व ८ चा पुरेसा साठा ठेवावा, अशा सूचना मतदार नोंदणी अधिकारी वर्षा पवार यांनी दिल्या.

प्रारूप यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांनी आवश्यक पुराव्यांसह नमुना ६ किंवा ८ भरून द्यावा, असे आवाहनही करण्यात आले. या बैठकीस निवडणूक नायब तहसीलदार सचिन बांबळे, गटविकास अधिकारी अमर माने, जिल्हा निवडणूक शाखेचे नायब तहसीलदार विशाल सदनापूर यांच्यासह सहायक मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

# निधनवार्ता

## लक्ष्मीबाई ढोकरे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे येथील प्रथितयश उद्योजक प्रदिप ढोकरे यांच्या मातोश्री व ढोकरे परिवाराच्या आधारस्तंभ लक्ष्मीबाई धोंडीबा ढोकरे यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने ढोकरे परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कै. लक्ष्मीबाई या अत्यंत प्रेमळ, कष्टाळू, धार्मिक आणि मनमिळावू स्वभावाच्या होत्या. धार्मिक कार्यामध्ये त्यांना विशेष आस्था होती. आपल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीवर त्यांनी मायेची सावली ठेवली आणि संस्कारांची शिदोरी पुढील पिढीला दिली.

पतीचे लवकर निधन झाल्यानंतर कुटुंबाची जबाबदारी मोठ्या धैर्याने सांभाळताना त्यांनी कधीही परिस्थितीसमोर हार मानली नाही. अनेक अडचणींचा सामना करत त्यांनी आपल्या मुलांना चांगले शिक्षण आणि संस्कार दिले. त्यांच्या पाचही मुलांना उच्चशिक्षित करून स्वत:च्या पायावर उभे करण्यामध्ये त्यांचा मोठा वाटा आहे. आज त्यांची चार मुले पुणे येथे कार्यरत असून, एक मुलगा शेतीची जबाबदारी सांभाळत आहे. मुलांसह सुना, नातू, नातवंडे असा त्यांचा मोठा आणि अखंड परिवार आहे. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे आणि मायेच्या आधारामुळे त्या संपूर्ण कुटुंबाच्या आधारवडासमान होत्या. त्यांच्या जाण्याने परिवाराने केवळ एक ज्येष्ठ व्यक्ती नव्हे, तर प्रेम, संस्कार आणि मायेची सावली गमावली आहे. दैनिक युवावार्ता परिवारातर्फे कै. लक्ष्मीबाईंना भावपूर्ण श्रद्धांजली!

## हौसाबाई बागड यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अकोले तालुक्यातील विठे येथील व हल्ली संगमनेर तालुक्यातील रायते-वाघापूर रोड परिसरातील गं. भा. हौसाबाई दगडू बागड यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. प्रवरातीरावर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने बागड परिवारासह नातेवाईक, आप्तेष्ट व पंचक्रोशीत शोककळा पसरली आहे. अत्यंत प्रेमळ, मायाळू आणि कुटुंबवत्सल स्वभावाच्या हौसाबाई बागड यांनी आपल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला मायेची ऊब व आधार दिला. त्यांच्या जाण्याने कुटुंबाने मायेची सावली गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. भारती नालकर यांच्या त्या मातोश्री होत.

त्यांच्या पश्चात मुली रोहिणी नानासाहेब गुंजाळ, कल्पना दत्तात्रय डोंगरे, भारती तरुण नालकर, ज्योती ज्ञानेश्वर फरगडे, माधुरी विजय काळे, ज्ञानेश्वरी दत्तात्रय नवले, मुलगा सिद्धेश्वर दगडू बागड, तसेच राजन अशोक शिंदे जावई, भाऊ, बहिणी, दिर, पुतणे, पुतण्या, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## देवराम गायकवाड यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आश्वी खुर्द, ता. संगमनेर येथील धार्मिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले, आदर्श कुंदुबवस्तल जेष्ठ व्यक्तीमत्व देवराम कुंडलिक गायकवाड (वय ७५) यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे आश्वी खुर्द परिसरात एक आदर्श संस्कारी कुटुंब प्रमुख व शिक्षित कुटुंब निर्माण करण्यात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती.

त्यांच्या पश्चात पत्नी तिन भाऊ भावजया दोन बहीणी मेव्हणे तिन मुले सुना, तिन नाती नात जावई , पाच पुतणे,चार पुतण्या नातवंडे परतोंड असा मोठा परिवार आहे. आश्वी खुर्द येथील प्रवरातीरी शोकाकुल वातावरणात देवराम गायकवाड यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आश्वी खुर्द ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच अनिल गायकवाड मुंबई पोलिस मेजर सुनिल गायकवाड नानासाहेब गायकवाड यांचे वडील सुभाष गायकवाड बाळासाहेब गायकवाड सुरेश गायकवाड यांचे बंधु तर पत्रकार संजय गायकवाड महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीत कार्यरत गणेश गायकवाड विजय गायकवाड सोमनाथ गायकवाड विनेप गायकवाड ऋषीकेश गायकवाड वैभव गायकवाड संदिप गायकवाड यांचे चुलते होत.

# बचतीतून अडचणींची नौका पार होवू शकते : राजेश मालपाणी

## सेवक पतसंस्थेची वार्षिक सभा; संस्थेला चाळीस लाखांचा नफा



संगमनेर (प्रतिनिधी)

सहकार, आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदांचा विश्वास या भक्कम आधारावर मालपाणी उद्योग समूह सेवकांची सहकारी पतसंस्था पन्नासाव्या वर्षाकडे वाटचाल करत आहे. सहा कोटींहून अधिक भागभांडवल, शून्य टक्के थकबाकी, ६.८० टक्के लाभांश, लेखापरीक्षणात सतत 'अ' वर्ग दर्जा, सुमारे ४० लाखांचा नफा आणि अद्ययावत कामकाज प्रणालीचा वापर ही संस्थेच्या प्रगतीची ठळक वैशिष्ट्ये असल्याचे प्रतिपादन मालपाणी उद्योग समूहाचे चेअरमन राजेश मालपाणी यांनी केले.

मालपाणी उद्योग समूह सेवकांच्या सहकारी पतसंस्थेची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. संस्थेचे चेअरमन मुकेश काठे, कॉ. माधव नेहे, व्हा. चेअरमन संतोष पोकळे, संचालक भारत घोडेकर, उमेश सोनसळे आणि बालाजी हजारे मंचावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना राजेश मालपाणी म्हणाले की, संस्थेने आतापर्यंत विश्वासार्हतेची परंपरा जपली आहे. सभासदांच्या हिताचा विचार करुन भविष्यात लाभांश वाढविण्यासाठी संस्थेच्या कामकाजात आणखी सकारात्मक बदल आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर करुन कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक आणि आधुनिक करण्यावर भर दिला पाहिजे. सभासदांच्या विमा मागणीबाबतही त्यांनी भाष्य केले. गुंतवणूक आणि परतावा यांचा योग्य ताळमेळ बसवून 'ईएसआयसी' योजनेचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. डिजिटल युगात आर्थिक व्यवहारांची पद्धत झपाट्याने बदलत असल्याचे सांगताना त्यांनी यूपीआय व्यवहाराच्या वाढत्या वापराकडे उपस्थितांचे लक्ष वेधले. आज बँकेतील व्यवहारापासून मंदिरातील देणगी देण्यापर्यंत सर्वत्र कॅश आणि पेपरलेस व्यवहार होत आहेत. त्यामुळे संस्थेनही डिजिटल युगाशी जुळवून घेण्याचा सल्ला त्यांनी दिला. संस्थेची पन्नास वर्षांकडे होत असलेली वाटचाल प्रत्येक सभासदासाठी अभिमानास्पद आहे. सभासदांनी आपल्या संस्थेतच बचत योजनांची अंमलबजावणी करावी बचत अडचणीच्या काळातून पार करणारी नौका आहे, असे सांगत त्यांनी आर्थिक नियोजनाचे महत्त्व पटवून दिले.

संस्थेचे चेअरमन मुकेश काठे यांनी प्रास्तविक करताना संस्थेच्या प्रगतीचा धावता आलेख मांडला. कॉ.माधव नेहे यांनी संस्थेच्या स्थापनेमागील इतिहासाला उजाळा दिला. स्वर्गीय ओंकारशेठ व स्वर्गीय माधवशेठजी मालपाणी यांच्यासह कामगार नेते कॉ.सहाणे मास्तर यांच्या दूरदृष्टीतून ही संस्था उभी राहिल्याची आठवण त्यांनी केली. मनुष्यबळ विभागाचे व्यवस्थापक बालाजी पाटील यांनी संस्थेच्या स्थापना काळातील बाजारपेठ, तंबाखू कामगारांच्या चळवळी आणि तत्कालीन आर्थिक धोरण यावर प्रकाश टाकताना संस्थेच्या स्थापनेमागील हेतू विशद् केला.

मुरारी देशपांडे यांनी दिवंगत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कवितांचे सादरीकरण करुन राष्ट्रभक्तीचे स्फूरण चढवले. यावेळी मुदतपूर्व कर्जफेड व उच्चांकी शेअर भांडवल असणार्या सभासदांसह गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कंपनीचे कार्यकारी संचालक रमेश घोलप, मनुष्यबळ विभागाचे व्यवस्थापक शिवाजी आहेर, स्टाफ सोसायटीचे चेअरमन राजेश दुबे, व्हा.चेअरमन राहुल शेरमाळे, देवदत्त सोमवंशी यांच्यासह सभासद व त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते. संस्थेचे सेक्रेटरी भानुदास कानवडे, विजय दुबे, मंगेश उणवणे यांनी विशेष परिश्रम घेतले. नवनाथ वावरे आणि चंद्रकांत आव्हाड यांनी सूत्रसंचालन तर, संतोष पोकळे यांनी आभार मानले.

## जिल्ह्यातून ३४ हरकती दाखल सोमवार शेवटचा दिवस

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- अनेक महिन्यांपासून प्रशासक असलेल्या जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक संभाजी निकम यांनी मंगळवार (दि.१८) निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली. या यादीवर येत्या सोमवार (दि. ३१) पर्यंत हरकती व सुचना करण्याची मुदत आहे. दुसरीकडे प्रारूप मतदार यादी जाहीर झाल्यापासून गेल्या आठ ते नऊ दिवसात जिल्हाभरातून केवळ ३४ हरकती दाखल झालेल्या आहेत.

दरम्यान, आज शुक्रवार (दि. २८) ते रविवार (दि.३०) सलग सुट्ट्या असल्याने आता जिल्हा बँकेच्या प्रारूप मतदार यादीवर सोमवार (दि.३१) रोजी एकच दिवस हरकतीसाठी शिल्लक आहे. या अखेरच्या दिवशी हरकती दाखल करण्यासाठी गर्दी होण्याची शक्यता आहे. प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सुनावणी होवून अंतिम मतदार यादी १५ सप्टेंबरला प्रसिद्ध होणार आहे.त्यानंतर बँकेच्या २१ संचालकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होईल. दरम्यान, यंदा निवडणुकीसाठी बँकेचे ३ हजार ६७७ मतदार आहेत. त्यात ३६६ संस्थेचे ठराव अपात्र ठरले असून २३३ संस्थांनी ठराव सादर केले नाहीत. दाखल असलेल्या हरकतीमध्ये नेवासा ६ आणि अकोले आणि नगर तालुका ५, राहुरी, जामखेड, राहाता, पाथर्डी आणि शेवगाव प्रत्येकी १, पारनेर ३. कर्जत आणि श्रीगोंदा प्रत्येकी ४, श्रीरामपूर २ यांचा समावेश आहे. गेल्या आठवड्यात तालुकानिहाय आणि बँकेच्या शाखानिहाय मतदार यादी कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर गुरूवार (दि. २७) तारखेपर्यंत सहकार विभागाकडे ३४ हरकती दाखल झालेल्या आहेत. यात सर्वाधिक नेवासा तालुक्यातून ६ आणि नगर व अकोलेतून ५ यांचा समावेश आहे. तर राहुरी, जामखेड, राहाता, पाथर्डी आणि शेवगाव तालुक्यातून प्रत्येकी एका हरकतीचा समावेश आहे. सोमवारी जिल्हा बँकेच्या प्रारूप मतदार यादीवर हरकती दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे.

## राहुल दादा कराड यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा !

### लोकशाहीच्या बळकटीकरणाचा ध्यास घेतलेले नेतृत्व



डॉ. राहुल विश्वनाथ कराड हे केवळ एक नाव नसून भारतीय लोकशाहीला नवसंजीवनी देणाऱ्या एका वैचारिक चळवळीचे नेतृत्व आहे. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे (MIT-WPU) कार्याध्यक्ष म्हणून शैक्षणिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवतानाच, ते राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सक्रिय आहेत. पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन 'राष्ट्र प्रथम' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवत त्यांनी लाखो युवक, जनप्रतिनिधी आणि ग्रामीण नेतृत्वाला एकाच व्यासपीठावर आणण्याचे अभूतपूर्व कार्य केले आहे.

देशातील सर्वच राज्यांतील आमदार, विधानपरिषद सदस्य आणि खासदारांना एकत्र आणणारे हे जगातील सर्वांत मोठे गैर-राजकीय व्यासपीठ आहे. राजकीय मतभेद विसरून कायदा निर्मिती, पारदर्शकता, तंत्रज्ञानाचा वापर आणि जनकेंद्री धोरणांवर सखोल चर्चा घडवून आणणे हा यामागचा त्यांचा मुख्य उद्देश आहे. संसदीय चर्चांचा दर्जा उंचावण्यासाठी ही संसदेच्या इतिहासातील एक क्रांतिकारी पायरी ठरली आहे. दादांनी

**भारतीय विद्यार्थी संसद** (INSP) **युवा नेतृत्वाची स्थापना केली** - गेल्या दोन दशकांपासून कार्यरत असलेल्या या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी लाखो विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्यांची आणि संविधानाची ओळख करून दिली आहे. युवकांनी केवळ करिअर केंद्रित न राहता राष्ट्रनिर्माणात सहभाग नोंदवावा, या ध्येयाने हे व्यासपीठ युवकांना थेट देशातील ज्येष्ठ नेते, विचारवंत आणि धोरणकर्त्यांशी संवादाची संधी उपलब्ध करून देते. दादांच्या संकल्पनेतून स्थापन झालेल्या

**राष्ट्रीय सरपंच संसद ग्रामस्वराज्याचे सबलीकरण:**

'गावाचा विकास हाच राष्ट्राचा विकास' या तत्त्वावर आधारित या उपक्रमाद्वारे हजारो सरपंचांना एकत्र आणण्यात आले आहे. ग्रामपंचायतींचे सक्षमीकरण, शाश्वत विकास आराखडा आणि तरुण व महिला सरपंचांना नेतृत्व गुणांचे धडे देण्याचे काम या चळवळीने केले आहे. यामुळे महात्मा गांधी यांच्या 'ग्रामस्वराज्य' या स्वप्नाला मूर्त स्वरूप मिळत आहे.

महिलांच्या राजकीय व सामाजिक सहभागाला गती देण्यासाठी त्यांनी 'नॅशनल वूमेन्स पार्लमेंट'ची पायाभरणी केली. राजकारण, उद्योग, शिक्षण आणि प्रशासन अशा विविध क्षेत्रांतील महिलांना एकत्र आणून त्यांच्या प्रश्नांवर राष्ट्रीय पातळीवर धोरणात्मक मंथन घडवून आणण्यात हे व्यासपीठ यशस्वी ठरले आहे. डॉ. राहुल कराड यांनी लोकशाहीकडे केवळ एक शासनप्रणाली म्हणून न पाहता, ती एक 'सक्रिय जीवनपद्धती' म्हणून रुजवली आहे. वैचारिक परिपक्वता, सर्वसमावेशकता आणि दूरदृष्टी या त्रिसूत्रीच्या आधारे त्यांनी भारतीय लोकशाहीला अधिक प्रगल्भ आणि सर्वसमावेशक बनवले आहे.

माननीय डॉ. राहुल दादा कराड यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! त्यांचे हे राष्ट्रनिर्माणाचे आणि लोकशाही बळकटीकरणाचे कार्य असेच अविरत आणि उत्तरोत्तर यशस्वी होत राहो, हीच सदिच्छा!

**डॉ.नामदेव गुंजाळ**

**संगमनेर, मो. ९८२२०६०६०४**

## नृत्य लावणीसाठी 'प्रमाणपत्र' बंधनकारक

मुंबई (वृत्तसंस्था) कार्यक्रमांमध्ये वाढत्या अश्लीलतेला आळा महाराष्ट्रातील सांस्कृतिक घालण्यासाठी राज्य सरकारने एक अत्यंत कठोर निर्णय घेतला आहे. यापुढे राज्यात डीजे शो आणि लावणीच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी 'उपयुक्तता प्रमाणपत्र' (सूटेबीलिटी सर्टिफिकेट) घेणे अनिवार्य असणार आहे. हे प्रमाणपत्र असल्याशिवाय अशा कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमांना परवानगी दिली जाणार नाही. कला आणि संस्कृतीच्या नावाखाली होणाऱ्या अश्लील सादरीकरणांवर आणि गोंधळावर नियंत्रण मिळवणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे. पारंपरिक लावणी कलेचे मूळ सौंदर्य जपले जावे आणि सार्वजनिक ठिकाणी कौटुंबिक वातावरणात कार्यक्रम पार पडावेत, यासाठी गृह विभाग व सांस्कृतिक कार्य विभागाने ही पावले उचलली आहेत. लावणी, ऑर्केस्ट्रा, डीजे शो आणि इतर व्यावसायिक सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजकांना रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाकडून हे प्रमाणपत्र मिळवावे लागेल.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# संग्राम नागरी सहकारी पतसंस्थेची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नविन वास्तूमध्ये उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक विभाग कार्यक्षेत्र असलेल्या व संगमनेर तालुक्यात अग्रगण्य असलेल्या संग्राम नागरी सहकारी पतसंस्थेची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार २६ ऑगस्ट रोजी संस्थेच्या भव्य वास्तूमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेने ३ कोटी ४१ लाख रुपयांचा नफा मिळविला असून, संस्थेच्या या उल्लेखनीय आर्थिक कामगिरीबद्दल सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या शिस्तबद्ध सहकार विचारांचा वारसा आणि लोकनेते मा. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनातून संस्थापक मा. डॉ. सुधीर तांबे, संगमनेर नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे व मा. आमदार सत्यजितदादा तांबे यांच्या नेतृत्वाखाली संग्राम पतसंस्थेने सातत्याने प्रगतीची नवी शिखरे गाठली आहेत.

संस्थेची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस अधिक भक्कम होत असून, संस्थेकडे १५६ कोटी ३५ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेचे भागभांडवल १ कोटी ८८ लाख रुपये, कर्जवाटप १३२ कोटी ९९ लाख रुपये, तर गुंतवणूक ५५ कोटी ४७ लाख रुपये आहे. तसेच संस्थेकडे ११ कोटी २० लाख रुपयांचा राखीव निधी व २९ कोटी ८६ लाख रुपयांचा स्वनिधी असून, स्थापनेपासून संस्थेला 'अ' ऑडिट वर्ग प्राप्त आहे.

यावेळी संस्थापक मा. डॉ. सुधीर तांबे यांनी संस्थेच्या नवीन वास्तूचे काम पूर्ण झाल्याचे सांगून सभासदांना आधुनिक व तत्पर सेवा देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. चांगल्या कर्जदारांना योग्य कर्जपुरवठा करण्याबरोबरच छोट्या कर्जदारांना आर्थिक पाठबळ देऊन त्यांच्या व्यवसायाला चालना देण्यावर संस्थेने भर द्यावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. संगमनेर नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे, अमृतवाहिनी सहकारी बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी व संगमनेर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष सी.ए. बापुसाहेब टाक यांनी संस्थेच्या प्रगतीचे व पारदर्शक कारभाराचे कौतुक केले.

सभेच्या प्रारंभी संस्थेचे चेअरमन श्री. राणीप्रसाद मुंदडा यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या वाटचालीचा आढावा दिला. व्हा. चेअरमन इंजि. विजय गिरी यांनी आभार मानले, तर सूत्रसंचालन व अहवाल वाचन श्री. उमेश शिंदे यांनी केले.

यावेळी चेअरमन राणीप्रसाद मुंदडा, व्हा. चेअरमन इंजि. विजय गिरी, डॉ. एन.एस. शेख, विलास दिघे, डॉ. माणिकराव शेवाळे, सूर्यकांत शिंदे, नानासाहेब वर्पे, दत्तात्रय आरोटे, ॲड. प्रशांत गुंजाळ, सूचित गांधी, सुदीप वाकळे, उमेश बोटकर, श्रीकांत कोकणे, सोमेश्वर दिवटे, सौ. सुलभाताई दिघे, सौ. सुनंदाताई दिघे, अनिल सातपुते, सी.ए. अमित कलंत्री, व्यवस्थापकीय सल्लागार प्रकाश गुंजाळ तसेच संचालक मंडळाचे सदस्य, सभासद, मान्यवर व कर्मचारी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेसकडून स्वागत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख सुनेत्रा पवार या गुरुवारी (दि. २७) लोणी येथे जात असताना मांची फाटा (ता. संगमनेर) येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सरुनाथ उंबरकर यांच्या नेतृत्वाखाली त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी उंबरकर यांनी परिसरातील विविध विकासकामांसाठी निधी मागणीचे एक सविस्तर निवेदन उपमुख्यमंत्री पवार यांना दिले. या निवेदनाद्वारे स्थानिक विकासाला गती देण्याची मागणी देखील करण्यात आली. उपमुख्यमंत्री पवार यांनीही निवेदनाचा स्वीकार करत कार्यकर्त्यांशी संवाद साधला. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष कपिल पवार, शौकत जहागिरदार, विठ्ठल भुसाळ, भागवत खेमनर, सुरेश भुसाळ, गणेश भुसाळ,

स्वप्नील उंबरकर, सचिन सारबंदे, रवींद्र भुसाळ, संकेत-खेमनर, रमजान शेख, ऋतिक माळी, सुनील बर्डे, आणि हरीष उपाध्ये यांच्यासह परिसरातील नागरिक, राष्ट्रवादीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान घारगाव येथे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार थांबल्या असता राष्ट्रवादी काँग्रेसच्या अमृता कोळपकर यांनी साकुर परिसरातील विविध मागण्याचे निवेदन दिले. यावेळी जनार्दन आहेर यांच्यासह अनेक महिला व नागरिक उपस्थित होते.

# संगमनेर येथे भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

सकल स्वकुळ साळी समाज बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव सोहळा मंगळवार, २५ ऑगस्ट २०२६ रोजी संगमनेर शहरातील साळीवाडा येथील मंदिरात अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या जन्मोत्सवा निमित्त आयोजित विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांना समाज बांधवांसह महिला भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत गर्दी केली होती.

दिवसाची सुरुवात पहाटे भगवान श्री जिव्हेश्वर यांच्या मंगल महाअभिषेकाने झाली. त्यानंतर सकाळी श्री जिव्हेश्वर पोथी वाचन, भावपूर्ण जन्मोत्सव सोहळा आणि श्री सत्यनारायण महापूजा पार पडली. उपस्थितांसाठी अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती. दुपारी महाआरतीचा कार्यक्रम आमदार अमोलभाऊ खताळ यांचे बंधू राहुल भाऊ खताळ यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. महाआरतीनंतर उपस्थित सर्व भाविकांनी दर्शनाचा आणि महाप्रसादाचा लाभ घेतला.

महाआरतीप्रसंगी बोलताना राहुल खताळ यांनी समाज बांधवांना जन्मोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. स्वकुळ साळी समाजाच्या सामाजिक व धार्मिक कार्यासाठी आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी महत्त्वाची घोषणा त्यांनी यावेळी केली. तसेच समाजाच्या विकासासाठी आणि विविध उपक्रमांसाठी नेहमीच सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या सोहळ्याचे आयोजन स्वकुळ साळी समाजाचे लक्ष्मीनारायण देवस्थान ट्रस्ट (साळीवाडा, संगमनेर), स्वकुळ साळी युवा मंच, स्वकुळ साळी महिला मंच आणि समस्त स्वकुळ साळी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. याप्रसंगी ज्येष्ठ समाज बांधव भरतशेठ केसेकर, शरद दुर्गुळे सर आणि सुभाष सदाफुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंकुश केसेकर, सचिन कांबळे, राम पेटकर, संतोष कनोजे, योगेश बिचकर, योगेश मांगलेकर, प्रशांत केसेकर, गणेश केंद्रे, निलेश कनोजे, सचिन बुरसे, सचिन उपरे, सुनील दुर्गुळे, अवधूत दुर्गुळे, बाळासाहेब खाडे, सुनील कांबळे, शेखर कांबळे, संजय भिंगरे, घनश्याम उपरे, सुदर्शन सदाफुले आणि विनायक भंडारी यांच्यासह अनेक कार्यकर्ते व समाज बांधवांनी विशेष परिश्रम घेतले. दिवसभर चाललेल्या या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण भगवान श्री जिव्हेश्वर यांच्या जयघोषाने आणि भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता.

# शिक्षणासाठी जिद्द महत्त्वाची - ॲड. माधवराव कानवडे

युवावार्ता (प्रतिनिधी)

निमगावपागा - परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी शिक्षणाची जिद्द आणि कष्ट करण्याची तयारी असेल, तर यश निश्चित मिळते. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत पीएच.डी.पर्यंतचा डॉ. संतोष दिवे यांचा शैक्षणिक प्रवास प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन जिल्हा बँकेचे व्हाइस चेअरमन ॲड. माधवराव कानवडे यांनी केले.



पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल डॉ. संतोष दिवे यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी निमगाव बु. येथे भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन दिलीप भोरुंडे यांनी केले. यावेळी रवींद्र कानवडे, संपत कानवडे व बाळासाहेब कानवडे यांनी मनोगत व्यक्त करून डॉ. संतोष दिवे यांच्या शैक्षणिक वाटचालीचे व यशाचे कौतुक केले. सौ. नलिनी संतोष दिवे यांनी सत्कारमूर्ती डॉ. संतोष दिवे यांच्या कार्याचा परिचय करून दिला.

सत्काराला उत्तर देताना डॉ. संतोष दिवे यांनी पीएच.डी.पर्यंतच्या प्रवासातील कष्ट, संघर्ष आणि त्यांना सहकार्य करणाऱ्या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. सामाजिक व शैक्षणिक बांधिलकी जपत त्यांनी हायस्कूल तसेच मराठी शाळेसाठी प्रत्येकी पाच हजार रुपयांची अवांतर वाचनाची पुस्तके देण्याची घोषणा केली.

कार्यक्रमाचे आभार निलेश दिवे यांनी मानले. यावेळी सरपंच सोमनाथ कानवडे, अण्णासाहेब कानवडे, अशोक पुंजाजी कानवडे, भागवत कानवडे, दत्तात्रय दिवे, प्रकाश पवार, बागडे बाबा, पत्रकार नामदेव बागडे, पत्रकार संजय गोपाळे, आशिष कानवडे, भागवत रामनाथ कानवडे, सुनील दादाभाऊ कानवडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, ग्रामस्थ व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. संतोष दिवे यांच्या पीएच.डी. पदवीप्राप्तीबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ज्ञान, कर्तृत्व आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम घडविणारा हा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन
त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताह
ठिकाण- श्री दत्त मंदिर राजापूर खंदक आखाडा
वर्ष १
प्रारंभ- शुक्रवार २८/०८/२०२६ ते सोमवार ३१/०८/२०२६

| दिनांक | किर्तनकार (वेळ ७ ते ९) | संत पंगत |
|---|---|---|
| २८-८-२०२६ | ह.भ.प.बाबासाहेब महाराज वाणी (झरेकाठी)<br>सेवादान- सुभाष भाऊसाहेब देशमुख, पंढरीनाथ भाऊ हासे | प्रभात दूध डेअरी मित्र परीवार |
| २९-८-२०२६ | ह.भ.प.सागर महाराज दिंडे (नाशिक)<br>सेवादान- ह.भ.प.विशाल म. तिकांडे, ह.भ.प.जयश्री म. तिकांडे | कै.लक्ष्मीबाई व हरीपाटील आनंदा हासे यांचे स्मरणार्थ भाऊसाहेब हरीपाटील हासे |
| ३०-८-२०२६<br>मूर्ती स्थापना व कलशारोहन | ह.भ.प.श्रध्देय दिनानाथ महाराज ऋषीकेश यांच्या शुभहस्ते स.८.०० ते दु. ४.०० या वेळेत होईल.<br>ह.भ.प.शरद महाराज ढवळे (काकडवाडी)<br>सेवादान- तुकाराम गोरखनाथ हासे, (नाईक केअर फार्म,राजापूर)<br>सेवादान- शिवराम कारभारी हासे (महालक्ष्मी दुध) | भारत आनंदा हासे, भाऊराव नामदेव हासे, आनंदा गणपत हासे, मच्छिंद्र लक्ष्मण हासे, बबन काशिनाथ हासे, रावसाहेब ज्ञानदेव हासे, सुभाष विठ्ठल देशमुख, श्रीराम गोसावी, गणपत गोविंद खतोडे, भास्कर किसन सहाणे, मंगेश रावसाहेब हासे |
| ३१-८-२०२६ सायं. ७ ते ९<br>काला व महाप्रसाद | ह.भ.प.राजेंद्र महाराज सदगीर (संगमनेर)<br>सेवादान- निवृत्ती भाऊ हासे | खंदक आखाडा व दत्त मंदिर कमिटी महाप्रसाद |

* वादक- हर्षल महाराज ताजणे, दिपक राऊत काकडा व हरीपाठ - ह.भ.प. विश्वनाथ महाराज नवले हार्मोनियम - रावसाहेब सोन्याबापू हासे
* गायक- भारत महाराज गुंजाळ, शिवनाथ महाराज पवार, पोपट भोकनळ, पाणी सोजन्य - प्रशांत तिकांडे
* किर्तनसाथ - ह.भ.प. अनिताताई जाधव मुलींची वारकरी संस्था मंडप व सिस्टीम, बादशहा पवार (मंगळापूर) आचारी- अशोक वाळे (मंगळापूर)
* चोपदार - ज्ञानदेव शंकर हारो, शिवाजी कृष्णाजी गुंजाळ, काशिनाथ जाधव,

आपले नम्र- दत्त मंदिर समिती खंदक आखाडा व भजनी मंडळ राजापूर, मंगळापूर, कासारा दुमाला, चिखली, मालदाड रोड
देणगी स्कॅनर
दिगंबरा दिगंबरा श्रीपाद सेवा सहभाग- दैनिक युवावातार्ता परिवार, संगमनेर दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा

# श्रीरामपूर तालुका विकासाचा आढावा

## आमदार सत्यजीत तांबे यांचा विविध प्रश्नांवर संवाद



युवावार्ता (प्रतिनिधई)

श्रीरामपूर- ऑगस्ट २०२६ : श्रीरामपूर तालुक्याच्या दौऱ्यादरम्यान आमदार सत्यजीत तांबे यांनी विविध क्षेत्रातील नागरिक, संस्थाचालक, शिक्षक, व्यावसायिक आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत तालुक्यातील विविध प्रश्न आणि विकासाच्या मुद्द्यांची माहिती घेतली.

दौऱ्यात विविध शैक्षणिक संस्थांना भेटी देऊन शिक्षण क्षेत्रातील प्रश्न, विद्यार्थ्यांच्या गरजा, शैक्षणिक सुविधा आणि पायाभूत सुविधांबाबत चर्चा केली. बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना नवे ज्ञान, तंत्रज्ञान आणि कौशल्यांच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या गरजेवरही यावेळी चर्चा झाली. यासोबतच स्थानिक व्यावसायिकांशी संवाद साधत बाजारपेठेची परिस्थिती, व्यवसायातील अडचणी आणि त्यांच्या अपेक्षा जाणून घेतल्या. स्थानिक पातळीवरील प्रश्न समजून घेऊन ते योग्य व्यासपीठावर मांडणे आणि आवश्यक त्या बाबींसाठी पाठपुरावा करणे, हा दौऱ्याचा महत्त्वाचा उद्देश राहिला. श्रीरामपूर नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष करण ससाणे यांचीही आमदार तांबे यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शहरातील नागरिकांच्या अपेक्षा, स्थानिक प्रश्न आणि आवश्यक विकासकामांबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

श्रीरामपूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी स्थानिक नागरिक, संस्था आणि विविध क्षेत्रातील घटकांशी सातत्याने संवाद ठेवून त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आवश्यक पाठपुरावा करण्याची भूमिका आमदार सत्यजीत तांबे यांनी यावेळी व्यक्त केली.

## संपादकीय...

# हिमालय हादरला नाही, आपण हादरायला हवे !

हिमालय म्हणजे केवळ बर्फाच्छादित पर्वतरांगा नव्हेत. तो भारतीय उपखंडाच्या पर्यावरणीय समतोलाचा आधारस्तंभ आहे. नद्या, जंगलं, जैवविविधता, पर्जन्यचक्र आणि कोट्यवधी लोकांचे जीवन हिमालयाशी जोडलेले आहे. त्यामुळे हिमालयाच्या कुशीत घडणारी प्रत्येक नैसर्गिक घटना ही केवळ एका देशाची समस्या राहत नाही; तिचे पडसाद संपूर्ण दक्षिण आशियावर उमटतात. नेपाळ-तिबेट सीमेवर २६ ऑगस्टला आलेल्या भीषण फ्लॅश फ्लडने पुन्हा एकदा हा धोका आपल्या डोळ्यांसमोर आणला आहे. सुरुवातीला या घटनेमागे भूकंप असल्याची चर्चा झाली. मात्र पुढील वैज्ञानिक विश्लेषणानुसार मोठ्या हिमखंडाच्या कोसळण्यामुळे निर्माण झालेल्या बर्फ-दगडांच्या प्रचंड प्रवाहाने नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पाणी आणि गाळ ढकलला आणि त्यातून भीषण पूर आला. या घटनेमुळे काही वेळातच नदीची पातळी तब्बल नऊ मीटरपर्यंत वाढल्याचे वृत्त आहे.या आपत्तीचे खरे गांभीर्य आकडे सांगतात. शेकडो जणांचा मृत्यू झाला असून मोठ्या संख्येने नागरिक बेपत्ता आहेत. रस्ते, पूल, वीज व्यवस्था आणि सीमावर्ती पायाभूत सुविधा उद्ध्वस्त झाल्या आहेत. विशेष म्हणजे या भागातून कैलास-मानसरोवर यात्रेसह मोठ्या प्रमाणावर धार्मिक आणि पर्यटन प्रवास सुरू असतो. त्यामुळे आपत्तीचा फटका स्थानिक नागरिकांबरोबरच परदेशी पर्यटक आणि यात्रेकरूंनाही बसला. यातील महाराष्ट्राशी संबंधित चित्र अधिक चिंताजनक आहे. राज्यातील अनेक पर्यटक आणि यात्रेकरू या भागात अडकले आहेत. २८ ऑगस्टच्या उपलब्ध माहितीनुसार महाराष्ट्रातील ११४ नागरिक नेपाळ-तिबेट सीमेवरील पूरग्रस्त भागात अडकले होते, त्यापैकी ६१ जणांशी संपर्क होऊ शकलेला नव्हता. दळणवळण व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली आहे. राज्य सरकारने २४ तासांचा नियंत्रण कक्ष सुरू करून केंद्र सरकार आणि स्थानिक यंत्रणांच्या मदतीने शोध व बचावकार्य सुरू केले आहे. या सगळ्या परिस्थितीत एक प्रश्न मात्र ठामपणे विचारावा लागेल-आपत्ती आल्यानंतर मदत करण्यापेक्षा आपत्ती येण्यापूर्वी तयारी करण्यावर आपण किती भर देतो? हिमालयीन प्रदेशात पर्यटन झपाट्याने वाढत आहे. धार्मिक पर्यटन, ट्रेकिंग, साहसी पर्यटन आणि तीर्थयात्रांसाठी दरवर्षी हजारो लोक या दुर्गम भागात जातात. पर्यटन हा स्थानिक अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे; परंतु पर्यटनाच्या वाढीसोबत पर्यावरणीय संवेदनशीलतेचा विचार झाला पाहिजे. डोंगर फोडून रस्ते, मोठ्या प्रमाणात बांधकाम, नदीकाठची वस्ती आणि पायाभूत सुविधांचा अनियंत्रित विस्तार यामुळे निसर्गाची सहनशक्ती किती कमी होत आहे, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. याहून मोठा प्रश्न म्हणजे हवामान बदलाचा. हिमालयीन प्रदेशाचे तापमान वाढत असल्याने हिमनद्या वितळत आहेत, बर्फाचे आवरण बदलत आहे आणि पर्वतीय भूभाग अधिक अस्थिर होत असल्याचे वैज्ञानिक सांगतात. त्यामुळे हिमस्खलन, भूस्खलन, ग्लेशियल लेक आउटबर्स्ट फ्लड आणि अचानक येणाऱ्या पुरांचा धोका वाढत आहे. म्हणून आता केवळ 'नैसर्गिक आपत्ती' म्हणून अशा घटनांकडे पाहणे पुरेसे नाही. निसर्ग बदलतो आहे आणि त्यानुसार आपली विकासाची पद्धतही बदलली पाहिजे. पर्वतीय भागात कोणत्या ठिकाणी बांधकाम करावे, कुठे पर्यटनाला मर्यादा घालाव्यात, कोणत्या मार्गांवर पूर्वसूचना यंत्रणा उभारावी, कोणत्या यात्रेच्या काळात हवामानाचा धोका तपासावा, यासाठी स्वतंत्र आणि कठोर धोरण आवश्यक आहे. भारतीय पर्यटकांच्या सुरक्षेचाही स्वतंत्रपणे विचार व्हायला हवा. परदेशात जाणाऱ्या प्रत्येक पर्यटन किंवा धार्मिक समूहाची डिजिटल नोंद, आपत्कालीन संपर्कव्यवस्था, स्थाननिश्चितीची सुविधा आणि संकटाच्या वेळी तत्काळ संपर्क साधण्याची यंत्रणा सक्षम असली पाहिजे. नेपाळमधील आपत्तीने हे स्पष्ट केले आहे की मोबाइल नेटवर्क किंवा इंटरनेट बंद पडले की कुटुंबीयांपर्यंत माहिती पोहोचविणे किती कठीण होते. आज नेपाळमध्ये एखाद्या कुटुंबाचा सदस्य अडकला आहे, उद्या अशीच वेळ आपल्या देशातील एखाद्या हिमालयीन पर्यटनस्थळी येऊ शकते. म्हणून ही घटना केवळ नेपाळची दुःखद बातमी म्हणून पाहणे म्हणजे मोठी चूक ठरेल. विकास हवा, पर्यटन हवे, रस्ते हवेत, रोजगार हवा; पण त्यासाठी निसर्गाचा श्वास कोंडून चालणार नाही. निसर्गाशी संघर्ष करून केलेला विकास अखेर विनाशाचे रूप धारण करतो. त्यामुळे हिमालय वाचवणे म्हणजे केवळ पर्वत वाचवणे नव्हे, तर नद्या, पर्यावरण आणि मानवी जीवनाचे भविष्य सुरक्षित करणे होय.

हिमालय हादरला नाही; त्याच्या कुशीतला निसर्ग अस्थिर झाला आहे. आता मात्र आपण हादरायला हवे-कारण हा इशारा दुर्लक्षित केला, तर पुढची आपत्ती कुठे आणि किती मोठी असेल, हे सांगता येणार नाही.

# लाखो भाविकांच्या उपस्थितीमध्ये अश्विनाथ गडावर यात्रा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्याच्या सरहद्दीवर असणाऱ्या पारेगाव बुद्रुक येथील अश्विनाथगडावर परिसरातील लाखो भाविकांच्या उपस्थितीमध्ये पारंपारिक पद्धतीने मोठ्या उत्साहात आणि आनंदात यात्रा संपन्न झाली असून अश्विनीनाथ गड हा सामाजिक एकतेचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. निमोण येथे अश्विनाथ गडावर जाणाऱ्या मानाच्या काठीचे पूजन मा. महसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. यावेळी आर्किटेक्ट बी. आर. चकोर, सोमनाथ धोंडीबा घुगे, ज्ञानेश्वर धोंडीबा घुगे, ॲड. ज्ञानेश्वर सांगळे, चंद्रकांत घुगे, साहेबराव दादा मंडलिक, अनिल घुगे, गोरख घुगे, डी.एम घुगे, भानुदास कांडेकर, सुरेश सांगळे, पंढरी घुगे यांच्यासह युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ढोल ताशांच्या गजरात पारंपारिक पद्धतीने भव्य मिरवणूक संपन्न झाली.

अश्विनाथ डोंगर हा पारेगाव बुद्रुक,चिंचोली गुरव, पिंपळे, निमोण, देवकवठे, सिन्नर तालुक्यातील निऱ्हाळे, घोटेवाडी, कहांडळवाडी या सर्व गावांच्या मध्यवर्ती असलेल्या आणि अत्यंत पारंपारिक यात्रा उत्सव साजरा होणारा आश्विनाथ गड हा भाविकांचे मोठे श्रद्धास्थान आहे. वर्षभर येथे नागरिकांची मोठी गर्दी राहत असून हिंदू - मुस्लिम बांधवांचे एकत्र असलेले हे मंदिर हे राज्यभराचे वैशिष्ट्य आहे. दर गुरुवारी मोठ्या प्रमाणात हिंदू व मुस्लिम बांधव येथे एकत्र येतात तर श्रावणातील तिसऱ्या गुरुवारी ही भव्य जत्रा भरते. उत्तर महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव या यात्रेसाठी येतात तर नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातून हिंदू बांधवही मोठ्या संख्येने एकत्र या ठिकाणी येत असतात. मुस्लिम आणि हिंदू एकत्र पद्धतीने यात्रा साजरा करण्याचा हा पारंपारिक योग अनेक वर्षांचा या ठिकाणी आहे.

यावेळी बोलताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, भारत हा विविध संस्कृती, जाती,पंथ,धर्म यांनी बनलेला आहे.विविधतेतून एकता हे आपल्या देशाचे वैशिष्ट्य आहे. नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या या तीर्थक्षेत्राचे मोठे वैशिष्ट्य आहे. हिंदू व मुस्लिम बांधवासह सर्व धर्मीय बांधव या ठिकाणी एकत्र येतात पुजा करतात. धार्मिक भावनेने आनंदाने ही यात्रा साजरी करतात. एकमेकांप्रती आदर सहिष्णुता आणि एकात्मता असलेले हे सामाजिक एकतेचे मोठे प्रतीक आहे. निमोन येथे काठीचे होणारे स्वागत आणि प्रस्थान हे आनंददायी असते.

तर आर्किटेक बी.आर.चकोर म्हणाले की,लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी अश्विनाथ गडाच्या विकासासाठी सातत्याने निधी दिला आहे.याचबरोबर सिन्नर तालुक्याचे आमदार माणिकराव कोकाटे यांनीही या परिसराच्या विकासासाठी सातत्याने निधी देऊन या परिसराचे सुशोभीकरण केले आहे. त्यामुळे हे दोन्ही जिल्ह्यांचे मोठे धार्मिक आणि पर्यटनाचे क्षेत्र ठरले आहे. सर्वांची उपस्थिती हेच मोठे वैशिष्ट्य असल्याचे ते म्हणाले.

# सुकेवाडीतील कान्होबा देवस्थानात भक्तीची अखंड ज्योत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील सुकेवाडी येथे वसलेले श्री कान्होबा उर्फ कानिफनाथ महाराज देवस्थान हे महाराष्ट्रातील सातवे महत्त्वाचे नाथ सिद्धपीठ मानले जाते. ग्रामीण भागातील भक्तीभाव परंपरा आणि नाथसंप्रदायाची साधना यांचे सुंदर दर्शन येथे घडते या देवस्थानात हिंदू रिती रिवारजनुसार दररोज श्री कान्होबा देवाच्या समाधीची अत्यंत श्रद्धेने पूजा केली जाते. समाधीला स्वच्छ पाण्याने स्नान घालून गंध, हार फुले अर्पण केली जातात. सकाळची आरती गणपती बाप्पा, दत्त महाराज, कान्होबा देव, नवनाथ आरती सकाळी ६ वाजता तर सायंकाळची आरती सायंकाळी ७ : ३० वाजता होते. त्याचबरोबर गुरुवारी विशेष महाआरती होऊन महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप होते. ही परंपरा गावकऱ्यांनी पिढ्यानपिढ्या जपली आहे. देवस्थानातील सर्व पूजा सुकेवाडी गावातील ग्रामस्थांच्या सहभागातूनच पार पडते. देवस्थानासाठी गावकऱ्यांनी अधिकृत हिंदू पुजारी नेमले असून आकाश शशिकांत सातपुते सुकेवाडी अशोक महादू खर्डे सुकेवाडी हे दोघेही नित्य पूजा व धार्मिक विधी पार पाडत आहेत. नित्य पूजेसाठी लागणाऱ्या वस्तू व खर्च दररोजच्या पूजेसाठी हार, कापूर, तूप, तेल, गुलाबजल, अत्तर, अष्टगंध, चंदन, धूप, कापूस, वाती, भस्म, खडीसाखर, अशा विविध वस्तूंचा वापर केला जातो. ऑगस्ट २०२६ महिन्यातील ३१ दिवसांसाठी या सर्व वस्तूंचा एकूण खर्च सुमारे ३००० रुपये इतका झाला असून हा खर्च सुकेवाडी गावातील ग्रामस्थ नाथसेवेकरी नागेश दामू गुंजाळ, भीमराज रघुनाथ कुटे, बाबासाहेब गोपाळराव कुटे, अमोल अण्णासाहेब सातपुते, भाऊसाहेब पंढरीनाथ कुटे सुकेवाडी यांनी वस्तू स्वरूपाने उचलला आहे दर पौर्णिमेला देवस्थानात होम - हवनाचे आयोजन केले जाते. या होमासाठी श्रीफळ, तूप, साखर, सुपारी, बदाम, हळकुंड, खारीक, खोबरे, काळे तीळ, सातू, गुगळे, धूप, पेढे, गहू, तांदूळ, पंचामृत, फुले, फळे, आधी वस्तूंचा समावेश होतो. या सर्वांचा एकूण खर्च सुमारे ४००० रुपये असून हा खर्च सुकेवाडी गावातील ग्रामस्थ नाथसेवेकरी विकास विलास शेटे, दीपक मनोहर शिंदे, भाऊ सखाराम गुंजाळ, नारायण माधव जाधव,यांनी वस्तू स्वरूपाने केला आहे. सुकेवाडीतील हे नाथ सिद्ध पीठ केवळ धार्मिक स्थळ नसून गावकऱ्यांच्या एकोप्याचे आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. नित्य पूजा पौर्णिमेचे होम - हवन गुरुवारची महाआरती आणि महाप्रसाद या माध्यमातून येथे भक्तीची अखंड ज्योत तेवत ठेवली जात आहे..

# भा. गुं. पा. सह्याद्री विद्यालयात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी



संगमनेर - भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री विद्यालय, संगमनेर येथे सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालय, संगमनेर यांच्या वतीने राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या तपासणीमध्ये ० ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची '४ डी' अंतर्गत तपासणी करण्यात आली. यामध्ये जन्मजात दोष, पोषणतत्त्वांची कमतरता, बालपणातील आजार तसेच विकासातील विलंब व अपंगत्व यांची तपासणी करण्यात आली. आजार आढळलेल्या विद्यार्थ्यांना संदर्भ सेवा देऊन पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. विशेषतः हृदयविकाराचे निदान झालेल्या बालकांवर ठइझ अंतर्गत मोफत शस्त्रक्रियाही केली जाते.

ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजकुमार जऱ्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली नोडल अधिकारी डॉ. रूपाली गिरमे, डॉ. पूनम कचेरिया, डॉ. शीतल शेळके, डॉ. मार्गेपवार श्रीनिवास, डॉ. अनिकेत गोसावी, डॉ. कांचन देशमुख, श्री. सोमनाथ दातीर, श्री. निलेश तळपाडे, श्रीमती सुनीता मगर, श्रीमती सविता हिंगे व श्रीमती सुनंदा होडगर यांच्या पथकाने विद्यार्थ्यांची तपासणी केली.

यावेळी पंचायत समितीचे श्री. टेंगले यांनी भेट देऊन आरोग्य तपासणीची पाहणी केली. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. खेमनर एस.एम. यांनी तपासणीसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या.

या उपक्रमासाठी उपमुख्याध्यापिका श्रीमती दिघे एस.ए., पर्यवेक्षक श्री. देशमुख के.डी., श्री. दिघे ए.टी., श्री. विरेश नवले तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.


FinanCity
STOP THINKING START INVESTING

WE ARE HIRING !

JOIN OUR GROWING TEAM
Build your career with Financity and grow with the best.
APPLICATION DEADLINE: 31ST AUGUST 2026

BACK OFFICE - 25 POSITIONS(FEMALE)
• Data Entry & Documentation
• Report Preparation
• Office Support Tasks
— ELIGIBILITY — Any Graduate(Freshers & Experienced both can apply)

ADMIN / HR2 POSITIONS(FEMALE)
• HR Generalist Role
• Employee Coordination
• HR Documentation
— ELIGIBILITY — Any Graduate(Freshers & Experienced both can apply)

SALES MANAGER5 POSITIONS(MALE)
• Field Visit & Client Meeting
• New Client Acquisition
• Sales Target Achievement
— ELIGIBILITY — Any Graduate(Freshers & Experienced both can apply)

12TH PASS CANDIDATES CAN ALSO APPLY
APPLY NOW !
Send your CV / Resume or call us now
9834087762 / 9623532907
Address: Seva Setu Kendra, Near Gravy Yard Hotel, Akole Bypass Road, Sangamner 422605.


तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५३४/२०२६ दिनांक - २४/०३/२०२६

## जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. मस्तान शेखलाल शेख, रा.कनोली, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक ०४/०३/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. कनोली, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: नामे शेख मस्तान शेखलाल यांचा **जन्म मौजे कनोली ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक** १५/०६/१९८२ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कनोली यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कनोली यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


पाहिजेत
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १ M
जाहिरात व्यवस्थापक - १ M
डिझायनर - १ M/F
टेलिकॉलर - १ M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२,९३७०७७३५०४

भाड्याने देणे आहे
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

कामासाठी मुले, मुली पाहिजेत
अकाऊंटंट - १ (म.)
हेल्पर - १ (पु.)
सेल्समन - १ (पु./ म.)
कामाचा अनुभव आवश्यक
9422905155
9763232269

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

पाहिजेत
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
पुरूष - ४ जागा
(वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
8669184141

पाहिजेत
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849



SR THORAT
JOB
GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com



# वनहद्दीत मेंढ्या चारण्यासाठी मेंढपाळांची अडवणूक करू नका - आ. अमोल खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- वनविभागाच्या हद्दीत पारंपरिक पद्धतीने मेंढ्या घेऊन जाणाऱ्या मेंढपाळांना शासनाच्या नियमांनुसार मेंढ्या चारण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे वनहद्दीत मेंढ्या चारण्यासाठी मेंढपाळांची अडवणूक करू नका अशा सक्त सूचना आमदार अमोल खताळ यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचा पारंपरिक व्यवसाय मेंढीपालनावर अवलंबून आहे. विशेषतः पावसाळ्यानंतर मेंढ्यांना चराईसाठी विविध भागांत घेऊन जाण्याची परंपरा आहे. मात्र, वनहद्दीत मेंढ्या घेऊन जाताना वनविभागाच्या नियमांमुळे राज्यातील मेंढपाळांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता.या पार्श्वभूमीवर संगमनेर तालुक्यातील मेंढपाळांनी आमदार अमोल खताळ यांची भेट घेऊन वनविभागाच्या हद्दीत मेंढ्या चारण्यासाठी परवानगी मिळावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली होती. मेंढपाळांच्या या मागणीची दखल घेत आमदार खताळ यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी पाठपुरावा केला.

दरम्यान, वनहद्दीत मेंढ्या चारण्यासंदर्भात शासनाने अध्यादेश जारी केला आहे. या अध्यादेशाचे मेंढपाळ समाजाकडून स्वागत करण्यात येत आहे. शासनाच्या नियमांनुसार मेंढपाळांना चराईसाठी आवश्यक ती परवानगी देण्यात यावी. मेंढपाळांनीही स्थानिक वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय ठेवून नियमांचे पालन करावे. तसेच मेंढपाळ समाजाच्या पारंपरिक व्यवसायाला संरक्षण देऊन त्यांच्या अडचणी दूर कराव्यात, अशा सूचना आमदार खताळ यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. आमदार खताळ यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे मेंढपाळांच्या चराईचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत झाली असून, त्यांच्या प्रयत्नांचे तालुक्यातील मेंढपाळ समाजबांधवांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# शिक्षकांच्या रिक्त पदांवरून खा. लंकेंचा उपोषणाचा इशारा



अहिल्यानगर (प्रतिनिधी)-

प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता भार - कमी करावा आणि शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान थांबवावे, या मागणीसाठी खा. नीलेश लंके यांनी आक्रमक भूमिका घेतली न आहे. या मागण्यांवर ३ठोस न निर्णय व लेखी कृती आराखडा न मिळाल्यास १ सप्टेंबरपासून वे उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना दिलेल्या पत्रात जिल्ह्यातील शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न गंभीर असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. जिल्ह्यात प्राथमिक व पदवीधर शिक्षक संवर्गातील ४७१, तर माध्यमिक अशी एकूण २ हजार ५२५ खा. लंके यांनी जिल्हा विभागातील २ हजार ५४ पदे शिक्षकांची पदे रिक्त आहेत. प्रत्येक शिक्षकामागे २० विद्यार्थी गृहीत धरल्यास सुमारे ५० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर याचा परिणाम होत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. शिक्षकांची हजारो पदे रिक्त असताना ती भरण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली, आवश्यक प्रस्ताव व पाठपुरावा वेळेत का करण्यात आला नाही, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी कोणाची, तसेच कार्यरत शिक्षकांवर पडलेल्या अतिरिक्त कामाच्या भाराची जबाबदारी कोणाची, असे प्रश्न लंके यांनी उपस्थित केले आहेत.

# दंडे गोल्ड अँड डायमंड्सतर्फे सफाई कर्मचाऱ्यांसोबत रक्षाबंधन सण साजरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : १९२७ पासून सराफी व्यवसायात कार्यरत असलेल्या दंडे गोल्ड अँड डायमंड्स या सराफी पेढीच्या नाशिक रोड, सिन्नर आणि संगमनेर येथे शाखा आहेत. ग्राहकांचा विश्वास आणि सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविणाऱ्या दंडे गोल्ड अँड डायमंड्स, संगमनेर शाखेतर्फे रक्षाबंधनाचा सण यंदा संगमनेर नगरपरिषदेच्या सफाई कर्मचाऱ्यांसोबत साजरा करण्यात आला.

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी दररोज मेहनत घेणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दंडे गोल्ड अँड डायमंड्सच्या महिला कर्मचाऱ्यांनी सफाई कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. दिवसभर शहराच्या स्वच्छतेसाठी काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या योगदानाची दखल घेत, त्यांच्यासोबत रक्षाबंधनाचा आनंद साजरा करण्यात आला. या उपक्रमातून स्वच्छ आणि सुंदर संगमनेर घडविण्यासाठी मेहनत घेणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा छोटासा प्रयत्न करण्यात आला.




यावेळी दंडे गोल्ड अँड डायमंड्स, संगमनेर शाखेच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सफाई कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमाबद्दल दंडे गोल्ड अँड डायमंड्स परिवाराचे आभार मानले.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने जपलेला हा स्नेहाचा धागा म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाप्रती आदर आणि आपुलकी व्यक्त करण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे.

# मालदाड येथे शेतकरी परिसंवाद, नॅनो तंत्रज्ञानाचा वापर व ड्रोन प्रात्यक्षिकाने शेतकऱ्यांचे वेधले लक्ष



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मालदाड विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. मालदाड आणि 'इफको' (इंडियन फार्मर्स फर्टिलायझर को-ऑपरेटिव्ह लिमिटेड) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी परिसंवाद कार्यक्रमाला परिसरातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या विशेष परिसंवादाचे अध्यक्षस्थान इफकोचे आर. जी. बी. सदस्य मा. श्री साहेबराव रामचंद्र नवले साहेब यांनी भूषवले. अध्यक्षीय भाषणात बोलताना साहेबराव नवले यांनी शेतकऱ्यांना पारंपरिक युरियाचा वापर कमी करून नॅनो युरिया व नॅनो डीएपीचा अवलंब करण्याचे आवाहन केले. त्यासाठी चालू हंगामातील मका या पिकाची निवड करण्याचे त्यांनी शेतकऱ्यांना सुचवले. त्याचबरोबर जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढवण्यासाठीची मोहीम मालदड गावातून सुरू करू असा निश्चय करत ऊसातील पाचट व पिकाचा शिल्लक काडीकचरा न जाळता तो मातीतच कुजवण्यासाठी शेतकाऱ्यांना आवाहन केले.

कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. एम. एस. पवार, महाराष्ट्र राज्य विपणन व्यवस्थापक, इफको यांची उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना डॉ. एम. एस. पवार यांनी आधुनिक शेतीसाठी नॅनो तंत्रज्ञानावर आधारित खतांच्या महत्त्वावर विशेष प्रकाश टाकला. जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी, रासायनिक खतांचा अतिवापर रोखण्यासाठी आणि पिकांची उत्पादकता वाढवण्यासाठी नॅनो युरिया, नॅनो डीएपी, नॅनो झिंक आणि नॅनो कॉपर यांसारख्या अत्याधुनिक खतांचा वापर ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. 'सध्या होत असलेल्या रासायनिक खतांच्या असंतुलित वापरामुळे जमिनीचा सेंद्रिय कर्ब कमी झालेला आहे आणि तो वाढवायचा असेल तर एक सोपं मार्ग म्हणजे आपल्या शेतात निघणारे ऊसाचे पाचट आणि पिकाचा शिल्लक काडीकचरा न जाळता तो शेतातच कुजवणे गरजेचे आहे' असे त्यांनी सांगितले. पाचट कुजवण्याची प्रक्रिया जलद गतीने करण्यासाठी इफको बायोडिकंपोजरचा वापर करावा असे त्यांनी सांगितले. जमिनीचे जैविक गुणधर्म सुधारण्यासाठी जैविक खतांचा वापर उपयोगी असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर विद्राव्य खते, दुय्यम अन्नद्रव्ये, बायोस्टीम्युलंट आदींची माहिती त्यांनी दिली.

इफकोचे अहिल्यानगर जिल्हा सहाय्यक क्षेत्रीय व्यवस्थापक श्री विशाल बबन मगर यांनी इफको आणि इफकोच्या शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली. पुढे त्यांनी खतांच्या अतिवापरमुळे होणाऱ्या प्रदूषणावर प्रकाश टाकला. पाण्यामध्ये वाढलेले नायट्रेटचे प्रमाण, जमिनीतील कमी होत चाललेला सेंद्रिय कर्ब आणि हवेतील वाढलेले नायट्रस ऑक्साइड (छ२ज) सारखे हानीनिकारक वायु याचं मूळ कारण खतांचा असंतुलित वापर असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच कृषी अधिकारी, पंचायत समिती, संगमनेर दत्तात्रय साळुंखे यांनी 'एफ. एफ. एस.' (फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल) या नवीन प्रणालीबाबत सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले.

याचबरोबर कार्यक्रमास मालदाड सोसायटीचे चेअरमन रावसाहेब नवले, व्हा.चेअरमन प्रशांत नवले, मालदाड सोसायटीचे संचालक मंडळ, श्रमशक्ती कृषिमहाविद्यालय, मालदडचे प्राचार्य डॉ. अण्णासाहेब नवले आणि ६०० पेक्षा अधिक शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे आधुनिक कृषी ड्रोनद्वारे शेतात फवारणी कशी करावी, याचे थेट प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखवण्यात आले.

# साईचरणी ११ लाखांचे हिरेजडित सुवर्ण ब्रोच



युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी -नवी दिल्ली येथील रहिवासी आणि सध्या इटलीत स्थायिक असलेले साईभक्त सतीश कुमार चन्ना यांनी साईबाबांच्या चरणी ११ लाख १९ हजार रुपये किमतीचे अत्यंत आकर्षक व हिरेजडित सोन्याचे ब्रोच अर्पण केले आहे. हे ब्रोच एकूण ७५ ग्रॅम वजनाचे आहे. अत्यंत सुरेख, नयनरम्य नक्षीकाम आणि मौल्यवान हिऱ्यांची जोड देऊन हे सुवर्ण आभूषण तयार करण्यात आले आहे. हे ब्रोच साई संस्थानाकडे सुपूर्द केले. श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी संस्थानच्या वतीने चन्ना यांचा सत्कार केला. श्री साईबाबा मंदिराला दरवर्षी देश-विदेशातून कोट्यवधी रुपयांचे गुप्त व उघड दान प्राप्त होते. हुंडी, बँक ट्रान्सफर आणि क्यूआर कोडद्वारे दररोज लाखो रुपये जमा होतात. सोन्या-चांदीचे मुकुट, छत्र, ताट, आणि हिरेजडित आभूषणे भक्त मोठ्या श्रद्धेने अर्पण करतात. या दानाचा उपयोग संस्थानामार्फत मोफत प्रसादालय, रुग्णालये आणि शैक्षणिक उपक्रमांसाठी केला जातो.

## दिनविशेष

७०८: — जपानमध्ये पहिल्यांदा तांब्याची नाणी बनवली गेली. (पारंपारिक जपानी तारीख)
२००४: — मायकेल शुमाकर यांनी पाचव्यांदा फॉर्मुला वन ड्राईव्हर्स चॅम्पियनशिप जिंकले.
१९७४: — चौधरी चरणसिंग यांनी भारतीय लोक दल या राजकीय पक्षाची स्थापना केली.
१९६६: — द बीटल्स यांनी शेवटचा स्टेज शो केला.
१९४७: — डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली घटना समिती स्थापन झाली.
१९१८: — टिळकांनी मुंबई येथे काँग्रेसचे विशेष अधिवेशन बोलावले.
१८९८: — गुडईयर कंपनीची स्थापना झाली.
१८३३: — युनायटेड किंगडमच्या साम्राज्यात गुलामगिरीवर बंदी घातली.
१८३१: — मायकेल फॅरेडे याने विद्युत चुंबकीय प्रवर्तनाचा शोध लावला.
१८२५: — पोर्तुगालने ब्राझीलच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
१४९८: — वास्को द गामा कालिकतहुन पोर्तुगालला परत निघाला.

## जन्म

१९५९: अक्किनेनी नागार्जुन — दक्षिण भारतीय चित्रपट अभिनेते (निधन: ७ सप्टेंबर २०२०)
१९५८: मायकेल जॅक्सन — अमेरिकन गायक (निधन: २५ जून २००९ )
१९२३: रिचर्ड ऍटनबरो — इंग्लिश चित्रपट निर्माते, दिग्दर्शक अभिनेते
१९२३: हिरालाल गायकवाड — भारतीय क्रिकेट खेळाडू
१९१५: इन्ग्रिड बर्गमन — स्वीडीश अभिनेत्री (निधन: २९ ऑगस्ट १९८२ )
१९०५: मेजर ध्यानचंद — भारतीय हॉकीचे महान खेळाडू आणि तीन वेळा ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेते — पद्मभूषण, ऑलम्पिक सुर्वण पदक (निधन: ३ डिसेंबर १९७९ )
१९०१: विठ्ठलराव विखे पाटील — सहकारमहर्षी — पद्मश्री (निधन: २७ एप्रिल १९८० )
१८८७: जीवराज नारायण मेहता — भारतीय डॉक्टर आणि राजकारणी (निधन: ७ नोव्हेंबर
१८८०: बापूजी अणे — लोकनायक (निधन: २६ जानेवारी १९६८ )
१८६२: अँड्रु फिशर — ऑस्ट्रेलियाचे ५वे पंतप्रधान
८३०: हुआनबॉतिस्ता अल्बेर्डी — आर्जेन्टिनाचे राष्ट्रपिता

## मृत्यू

२००८: जयश्री गडकर — मराठी आणि हिंदी चित्रपटांतील प्रसिद्ध अभिनेत्री व नृत्यांगना — महाराष्ट्र शासनाचे विविध सन्मान (जन्म: २१ फेब्रुवारी १९४२ )
२००७: बनारसी दास गुप्ता — हरियाणाचे ४ थे मुख्यमंत्री (जन्म: ५ नोव्हेंबर १९१७ )
२००३: विला बीट्रिस प्लेयर — अमेरिकन शिक्षक, पहिल्या कृष्णवर्णीय महिला महाविद्यालयाच्या अध्यक्षा (जन्म: ९ सप्टेंबर १९०९ )
१९८६: अण्णासाहेब खेर — पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (जन्म: १५ जून १८९८ )
१९८२: इन्ग्रिड बर्गमन — स्वीडीश अभिनेत्री (जन्म: २९ ऑगस्ट १९१५ )
१९७६: काझी नझरुल इस्लाम — भारतीय क्रांतिकारक आणि बंगाली कवी — पद्म भूषण (जन्म: २५ मे १८९९ )
१९७५: इमॉन डी व्हॅलेरा — आयर्लंड प्रजासत्ताकाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: १४ ऑक्टोबर १८८२ )
१९६९: मेहबूबहुसेन पटेल — लोकशाहीर (जन्म: २० ऑक्टोबर १९१६ )
१९६९: शाहीर अमर शेख — लोकशाहीर (जन्म: २० ऑक्टोबर १९१६ )
१९११: महबूब अली खान — हैदराबाद संस्थानाचे ६वे निजाम (जन्म: १७ ऑगस्ट १८६६ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२९ ऑगस्ट**

## २९ ऑगस्ट १९४७ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीची स्थापना

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशासमोर सर्वात मोठे आणि ऐतिहासिक आव्हान होते, ते म्हणजे स्वतंत्र भारतासाठी सक्षम, लोकशाहीवादी आणि सर्वसमावेशक संविधान तयार करण्याचे. ब्रिटिश राजवटीतून मुक्त झालेल्या भारताला शासनव्यवस्था, नागरिकांचे अधिकार, केंद्र व राज्यांचे संबंध, न्यायव्यवस्था आणि सामाजिक समानता यांची स्पष्ट चौकट देण्यासाठी संविधानाची आवश्यकता होती. यासाठी संविधान सभेचे काम सुरू होते.भारताची संविधान सभा ९ डिसेंबर १९४६ रोजी प्रथम भरली. विविध समित्यांनी देशाच्या भावी राज्यघटनेतील मूलभूत अधिकार, केंद्र-राज्य संबंध, प्रांतीय शासनव्यवस्था आणि इतर महत्त्वाच्या विषयांवर विचार करून अहवाल तयार केले. या सर्व निर्णयांना कायदेशीर आणि घटनात्मक स्वरूप देण्यासाठी संविधानाच्या मसुद्याची आवश्यकता होती.याच पार्श्वभूमीवर २९ ऑगस्ट १९४७ रोजी संविधान सभेने मसुदा समितीची स्थापना केली. या समितीत डॉ. बी. आर. आंबेडकर, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, एन. गोपालस्वामी अय्यंगार, के. एम. मुन्शी, मोहम्मद सादुल्ला, बी. एल. मित्र आणि डी. पी. खेतान यांचा समावेश होता. पुढील दिवशी, ३० ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची या समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रख्यात कायदेपंडित, अर्थतज्ज्ञ, समाजचिंतक आणि लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे संविधानाच्या मसुदा निर्मितीची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर येणे ही ऐतिहासिक घटना ठरली. मसुदा समितीचे प्रमुख कार्य म्हणजे संविधान सभेने घेतलेल्या विविध निर्णयांच्या आधारे भारताच्या संविधानाचा मसुदा तयार करणे, त्याची छाननी करणे आणि आवश्यक सुधारणा सुचवणे हे होते.मसुदा समितीने अत्यंत कठीण परिस्थितीत आणि मोठ्या परिश्रमाने हे काम केले. डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांना संस्थात्मक आधार देण्याचा प्रयत्न केला. जातीय भेदभाव, अस्पृश्यता आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी संविधानात महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या. प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार आणि कायद्यापुढे समान संरक्षण मिळावे, यावर विशेष भर देण्यात आला.मसुदा समितीने तयार केलेला मसुदा संविधान सभेसमोर मांडण्यात आला. त्यावर सभेत सविस्तर चर्चा, वादविवाद आणि अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या. अखेर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने भारताचे संविधान स्वीकारले, तर २६ जानेवारी १९५० रोजी ते अमलात आले.भारतीय संविधानाच्या निर्मितीत अनेक सदस्यांचे योगदान असले तरी मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण होती. म्हणूनच २९ ऑगस्ट १९४७ हा भारतीय संविधानाच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो.

## १९०५ : मेजर ध्यानचंद - भारतीय हॉकीचे महान खेळाडू

**जन्मदिन विशेष**

भारतीय क्रीडा इतिहासात मेजर ध्यानचंद यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. आपल्या अप्रतिम हॉकी कौशल्याने त्यांनी भारताला जागतिक पातळीवर नवी ओळख मिळवून दिली. त्यांना 'हॉकीचा जादूगार' म्हणून ओळखले जाते. त्यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी अलाहाबाद (आताचे प्रयागराज), उत्तर प्रदेश येथे झाला. त्यांचे मूळ नाव ध्यानसिंग होते. वडिलांच्या सैन्यातील नोकरीमुळे कुटुंबाच्या अनेक ठिकाणी बदल्या होत राहिल्या. वयाच्या १६व्या वर्षी ते ब्रिटिश भारतीय सैन्यात दाखल झाले आणि याच काळात त्यांच्या हॉकी कारकिर्दीला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.ध्यानचंद यांच्या खेळातील सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे चेंडूवरील विलक्षण नियंत्रण, वेगवान ड्रिब्लिंग, अचूक पासिंग आणि गोल करण्याची अद्भुत क्षमता. सैन्यात असताना त्यांनी हॉकीचा नियमित सराव केला. १९२६ मध्ये त्यांनी भारतीय सैन्याच्या संघासोबत न्यूझीलंड दौरा केला आणि आपल्या खेळाने सर्वांचे लक्ष



वेधून घेतले. त्यानंतर ते भारतीय हॉकी संघातील प्रमुख खेळाडू बनले.ध्यानचंद यांच्या कारकिर्दीतील सर्वात मोठे यश म्हणजे सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून देण्यात त्यांचा सहभाग. १९२८ मध्ये ॲमस्टरडॅम येथे झालेल्या ऑलिम्पिकमध्ये भारताने हॉकीचे सुवर्णपदक जिंकले. या स्पर्धेत ध्यानचंद यांनी १४ गोल केले आणि ते स्पर्धेतील आघाडीचे गोलस्कोअरर ठरले.त्यानंतर १९३२ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये भारताने पुन्हा सुवर्णपदक पटकावले. या स्पर्धेत भारताने अमेरिकेचा २४-१ असा मोठा पराभव केला. या सामन्यात ध्यानचंद यांनी तब्बल ८ गोल केले.१९३६ च्या बर्लिन ऑलिम्पिकमध्ये ध्यानचंद भारतीय संघाचे कर्णधार होते. अंतिम सामन्यात भारताने जर्मनीचा ८-१ असा पराभव करून सलग तिसरे सुवर्णपदक मिळवले. अशा प्रकारे ध्यानचंद यांच्या ऑलिम्पिक कारकिर्दीत १९२८, १९३२ आणि १९३६ अशी तीन सुवर्णपदके जमा झाली.ध्यानचंद यांच्या खेळाने केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगात हॉकीची लोकप्रियता वाढवली. त्यांच्या स्टिकवरील चेंडूवरील नियंत्रण इतके विलक्षण होते की त्यांना 'द विझार्ड ऑफ हॉकी' किंवा 'हॉकीचा जादूगार' अशी उपाधी मिळाली. त्यांच्या योगदानाबद्दल भारत सरकारने १९५६ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने त्यांचा सन्मान केला.३ डिसेंबर १९७९ रोजी त्यांचे निधन झाले. मात्र त्यांची क्रीडाकथा आजही लाखो खेळाडूंना प्रेरणा देते. त्यांच्या जन्मदिनी, २९ ऑगस्टला भारतात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. भारतीय हॉकीला जागतिक कीर्ती मिळवून देणाऱ्या या महान खेळाडूचे योगदान भारतीय क्रीडा इतिहासात सदैव स्मरणात राहील. मेजर ध्यानचंद यांचे संपूर्ण आयुष्य भारतीय हॉकीच्या उत्कर्षासाठी समर्पित होते. त्यांचा खेळ केवळ गोल करण्यापुरता मर्यादित नव्हता, तर मैदानावरील त्यांची रणनीती, सहकाऱ्यांना अचूक पास देण्याची क्षमता आणि प्रतिस्पर्ध्यांच्या हालचालींचा अंदाज घेण्याची विलक्षण हातोटी यामुळे ते इतर खेळाडूंपेक्षा वेगळे ठरत. त्यांच्या स्टिकवरील चेंडूचे नियंत्रण पाहून प्रेक्षक मंत्रमुग्ध होत असत. त्यांच्या खेळाबाबत अनेक दंतकथा प्रचलित झाल्या; त्यांच्या स्टिकमध्ये चुंबक असल्याची अफवाही एकदा पसरली होती. मात्र त्यांच्या कौशल्यामागे सातत्यपूर्ण सराव, शिस्त, एकाग्रता आणि खेळाप्रती असलेली निष्ठा होती. सैन्यातील शिस्तीचा त्यांच्या खेळावर मोठा प्रभाव पडला.

पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९६६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर

# विश्वासाच्या भांडवलावरच हजार कोटींचा टप्पा पार - राजेश मालपाणी

## संगमनेर मर्चंट बँकेची ६१ वी वार्षिक सभा खेळीमेळीत




संगमनेर - ‘हजारो सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार, हितचिंतक आणि अत्यंत जबाबदारीने विश्वस्ताच्या भूमिकेतून काम करणारे संचालक साथीदार या सर्वांच्या एकजुटीमुळे आणि परस्पर विश्वासाच्या भांडवलावरच मर्चंट बँकेने हीरक महोत्सवी वर्षांमध्ये संमिश्र व्यवसायाची तब्बल १०३१ कोटी रुपयांची देदीप्यमान कामगिरी करून दाखविली. बँकेच्या नावलौकिकाला साजेशा रीतीने पुढील काळातही बँक अशीच प्रगतीची घोडदौड कायम ठेवून अग्रेसर राहील’ अशी ग्वाही संगमनेर मर्चंट बँकेचे चेअरमन व प्रमुख मार्गदर्शक उद्योगपती राजेश मालपणी यांनी येथे केले. मालपाणी लॉन्सच्या बँक्वेट सभागृहामध्ये बँकेची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सभासद बंधू भगिनींच्या भरगच्च उपस्थितीत संपन्न झाली. त्यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना चेअरमन या नात्याने त्यांनी वरील भूमिका मांडली. यावेळी व्यासपीठावर व्हा.चेअरमन मधुसूदन नावंदर, विद्यमान चेअरमन सीए संजय राठी व्हा.चेअरमन रवींद्र पवार, संचालक प्रकाश राठी, संतोष करवा, प्रकाश कलंत्री, मुकेश कोठारी, संदीप जाजू, महेश डंग, सम्राट भंडारी, वैभव दिवेकर, जुगल बाहेती, शाम भडांगे, संचालक गोपाळ पडताणी, सीए प्रवीण दिड्डी, ऑडिटर सीए जितेंद्र लाहोटी आदी मान्यवर उपस्थित होते.

संगमनेरची मर्चंट बँक म्हणजे ६१ वर्षांपूर्वी स्व. ओंकारनाथजी मालपाणी आणि त्यांच्या समविचारी सहकारी व्यापारी बंधूंनी उदात्त हेतूने स्थापन केलेली संस्था आहे. ही संस्था अनेकांच्या विकासाची गंगोत्री ठरली. बघता बघता वैभवशाली वाटचाल करून बँकेने लक्षवेधी साठ वर्षांची हीरक महोत्सवी वाटचाल देखील पूर्ण केली. बदलत्या काळाच्या सोबत बँकेने अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्राहकांना वेगवान सेवा आणि नैतिक मूल्यांवर आधारित १००% पारदर्शक कारभार या बळावर निरंतर आगेकुच सुरू ठेवली आहे. वाढत्या स्पर्धेमुळे नफ्याचे प्रमाण जरी कमी झाले असले तरी बँकेची आर्थिक स्थिती अत्यंत भक्कम असल्याने बँकेच्या कार्यक्षेत्रात आलेल्या अनेक मोठमोठ्या बँकांच्या स्पर्धानाही समर्थपणे बँक तोंड देत आहे. सभासदांच्या ठेवींची सुरक्षा हे सर्वात महत्त्वाचे आमचे लक्ष्य असून सध्याचा काळ आणि आगामी काळातील सायबर क्राईम चे वाढते धोके लक्षात घेऊन बँक डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवत आहे आणि अनेक उदाहरणांमधून ते संस्थेच्या आयटी विभागाने सिद्ध देखील केले आहे’ असे श्री मालपाणी आपल्या भाषणात म्हणाले. सहकारी बँकिंगच्या क्षेत्रात विविध प्रकारची उलथापालथ सुरू आहे. मात्र हीरक महोत्सवी वर्षात बँकेच्या व्यवसायात झालेली ३३% इतकी भरीव व्यवसाय वृद्धी बँकेवरील विश्वासाचे प्रतीक असल्याने बँकेवर जीवापाड प्रेम करणाऱ्या सर्वांना कितीही धन्यवाद दिले तरी ते कमीच आहेत’ असे श्री मालपाणी म्हणाले.

सभेच्या सुरुवातीला लक्ष्मी, साईबाबा, संस्थापक ओंकारनाथजी मालपाणी यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करण्यात आले. सभासदांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. सभेचे सूत्रसंचालन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष देसाई यांनी केले. मागील वार्षिक सभेच्या इतिवृत्ताचे त्यांनी वाचन करून त्यास उपस्थितांची मंजुरी घेतली संस्थेचे सभासद सर्वश्री गणेश बाहेती, मनीष मणियार, रामनाथ भंडारी, संजय क्षत्रिय, दिनेश सोमाणी, डॉ.जी.पी. शेख, महेश जाजू, ओंकार भंडारी, ओंकार बिहानी, बाळासाहेब देशमुख यांच्या विविध प्रश्नांना मालपाणी यांच्यासह चेअरमन राठी सीईओ देसाई यांनी समर्पक उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले.

# घारगाव परिसरात लुटमार करणाऱ्या एकाला अटक

## जबरी चोरी व चेन स्नॅचिंगचे तीन गुन्हे उघडकीस



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील घारगाव हद्दीत लुटमार करणाऱ्या टोळीतील एका आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्याच्याकडून ४१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जबरी चोरी व चेन स्नॅचिंगचे तीन गुन्हे पोलिसांनी उघडकीस आणले.

साकूर येथील संतोष सखाराम देवकाते हे १८ ऑगस्ट रोजी रात्री बिरोबा मंदिराजवळ रस्त्याच्या कडेला कार लावून झोपले होते. त्यावेळी दोन अज्ञात आरोपींनी त्यांना दमदाटी आणि मारहाण करून रोख रक्कम व मोबाईल बळजबरीने काढून घेतला होता. याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०९ (६), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, अंमलदार गणेश लोंढे, विष्णू भागवत, रिचर्ड गायकवाड, फुरकान शेख, प्रशांत राठोड, भगवान सानप, रोहित येमुल, बाळासाहेब गुंजाळ, निळकंठ कारखेले, अरुण मोरे व वंदना मोढवे यांचे पथक तपासासाठी रवाना केले. गुप्त बातमीदार आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे हा गुन्हा दिनेश राजाराम जाधव (रा. कौठे बुद्रुक, ता. संगमनेर) याने साथीदारासह केल्याची माहिती पथकाला मिळाली. तो २६ ऑगस्ट रोजी कौठे-वनकुटे रोडने घरी जात असताना घारगाव येथील साईसिद्धी हॉस्पिटलजवळ पथकाने सापळा रचला. पोलिसांना पाहताच तो दुचाकी टाकून पळू लागला, मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून रोख रक्कम, मोबाईल आणि दुचाकी असा एकूण ४१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपीकडे केलेल्या चौकशीत त्याने हा गुन्हा साथीदार नवनाथ उर्फ दगड्या भाऊसाहेब मधे (रा. वांगदरी, पिंपळदरी, ता. अकोले, सध्या फरार) याच्यासोबत केल्याची कबुली दिली. तसेच जुलै २०२६ मध्ये बोटा गावातील एका महिलेच्या गळ्यातील सोने ओरबाडल्याची आणि काही दिवसांपूर्वी माउली घाटात पाणी पिण्याच्या बहाण्याने एका वृद्धेच्या घरात घुसून चाकूने मारहाण करत मंगळसूत्र चोरल्याचीही माहिती त्याने दिली. या तपासातून घारगाव पोलीस ठाण्यातील तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
हेल्थ इंडिया इन्शुरन्स
FHPL हेल्थ इन्शुरन्स
इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
बजाज आलियांज इन्शुरन्स
एसबीआय जनरल इन्शुरन्स
ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
मेडसेव टीपीए प्रा.लि.
जेनिन्स इंडिया टीपीए लि.
ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
टाटा एआयजी इन्शुरन्स
रिलायन्स जनरल इन्शुरन्स
मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
नॅशनल इन्शुरन्स कं.
न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
युनायटेड हेल्थकेअर लि.
Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
एम.डी.इंडिया हेल्थकेअर
विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दैनिक युवावार्ताचे उपसंपादक
संजय नामदेव आहिरे
२९ ऑगस्ट
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
- शुभेच्छुक -
दैनिक युवावार्ता परिवार, संगमनेर

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करू नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
कर्ज रक्कम वाढ । कर्ज व्याजदर कमी । कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

मार्स युनिव्हर्स प्रायव्हेट लिमिटेड
टूर्स, ट्रॅव्हल्स आणि कॉर्पोरेट सर्व्हिसेस
तुमचे पाऊल मंगळावर ठेवण्यासाठी मार्स युनिव्हर्स सज्ज
प्रति व्यक्ती 59,000/-* (फुकेत, बँकॉक)
प्रति व्यक्ती 79,000/-* (व्हिएतनाम, सिंगापूर, बाली)
1 ला ग्रुप - 26 सप्टेंबर
2 रा ग्रुप - 1 ऑक्टोबर
3 रा ग्रुप - 10 ऑक्टोबर
संपर्क - किशोर सोनवणे 9309429705

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25